**जिल्हा परिषदेच्या दिनांक १५ मे २०१४ च्या गट-क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांच्या धोरणाच्या शासन निर्णयातील सुधारणा**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन पुरकपत्र क्रमांकः जिपब-४८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४**
ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन,मर्झबान पथ,फोर्ट, मंत्रालय, मुंबई-०१
दिनांक : ०७ मार्च, २०१९

वाचा:-

**१) शासन निर्णय क्रमांकः जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४,दि.१५ मे,२०१४**
**२) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४,दि.०२ जुलै, २०१४**
**३) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४,दि.२ जानेवारी,२०१७**
**४) शासन निर्णय क्रमांकः जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४,दि.२७ फेब्रुवारी,२०१७**

**शासन पुरकपत्र**

**प्रस्तावना:-**

यापूर्वी शासनाने दिनांक १५ मे,२०१४ च्या शासन निर्णयान्वये तसेच दिनांक ०२/०७/२०१४ व दिनांक ०२/०१/२०१७ च्या शुध्दीपत्रकान्वये जिल्हा परिषदेच्या गट क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत धोरण निश्चित केलेले आहे. सदर धोरणानुसार जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्याही जिल्हांतर्गत बदल्या करण्यात येत होत्या. परंतू शिक्षक संवर्गाची मोठी संख्या, त्यांचे इतर संवर्गापेक्षा असलेले कामाचे भिन्न स्वरूप लक्षात घेऊन, त्या अनुषंगाने १५ मे, २०१४ च्या शासन निर्णयातून केवळ शिक्षक संवर्ग वगळण्यात येवून दि. २७/२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आता जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत शिक्षक संवर्गासाठी सुधारीत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

२. वरील दि.२७.०२.२०१७ च्या शासन निर्णयानुसार पक्षाघाताने आजारी कर्मचारी, अपंग कर्मचारी, मतिमंद मुलांचे पालक व अपंग मुलांचे पालक, हृदय शस्त्रक्रीया झालेले कर्मचारी, जन्मापासून एकच मुत्रपिंड असलेले/मुत्रपिंड रोपण केलेले कर्मचारी/डायलिसिस सुरु असलेले कर्मचारी, कर्करोगाने आजारी कर्मचारी, आजी/माजी सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी/विधवा, विधवा कर्मचारी, कुमारीका कर्मचारी, परित्यक्त्या/घटस्फोटित महिला कर्मचारी आणि वयाची ५३ वर्ष पुर्ण केलेले कर्मचारी यांचा समावेश विशेष संवर्ग भाग १ मध्ये करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा परिषदेच्या अन्य गट क (वर्ग-३) व गट ड (वर्ग-४) च्या वरिल बाबीमध्ये मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून बदलीमध्ये सूट देण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानुषंगाने शासनाने या संवर्गामध्ये मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांचा समावेश आता संदर्भाधीन क्रमांक १ मधील दि. १५.०५.२०१४ च्या शासन निर्णयात करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय:-**

**दिनांक १५ में २०१४ च्या शासन निर्णयामधील**
**प्रकरण क्र. १ मधील (३-ब)** च्या सुरुवातीस-

(१) मेंदूचा आजार झालेले कर्मचारी

(२) थॅलेसेमिया विकारग्रस्त मुलांचे पालक/जन्मजात गुणसुत्राचे दोषामुळे उद्भवणारे आजार.(उदा.Methyl Malonic Acidemia(MMA) Classical type (Mutase defiency व इतर आजार)
या आजारांचा समावेश करण्यात येत आहे.

(३) तसेच **परिच्छेद ३ ब** येथे अपंग कर्मचाऱ्यांना व मतीमंद मुलांच्या पालकांना सुट यापुर्वीच्या संवर्गात अपंग मुलांचे पालक हा संवर्ग समाविष्ट करण्यात येत आहे.

**परिच्छेद ४ (२)** मध्ये अनुक्रमांक ७ येथे स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी/नातू/नात(स्वातंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत) यांचा समावेश करण्यात येत आहे.

तसेच **परिच्छेद ४ (४) (१)** च्या सुरुवातीस मेंदूचा आजार झालेले कर्मचारी व थॅलेसेमिया विकारग्रस्त मुलांचे पालक/जन्मजात गुणसुत्राचे दोषामुळे उद्भवणारे आजार.(उदा.Methyl Malonic Acidemia(MMA) Classical type (Mutase defiency व इतर आजार) यांचा समावेश करण्यात येत आहे.

तसेच **परिच्छेद ४ (४) (२)** मध्ये अपंग कर्मचारी / मतीमंद मुलाचे पालक यामध्ये अपंग मुलांचे पालक हा संवर्ग समाविष्ट करण्यात येत आहे.

तसेच **परिच्छेद ४ (४) (११)** नंतर स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी/नातू/नात(स्वातंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत) हा संवर्ग समाविष्ट करण्यात येत आहे.

२. विनंती बदलीसाठी संबंधीत कर्मचाऱ्याची जिल्हा परिषदेमध्ये कमीत कमी ३ वर्षाची सेवा होणे आवश्यक आहे.

सदर शासन पुरकपत्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय संकेतांक २०१९०३०२११०२३९५५२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.03.08 15:25:09 +05'30'

( प्रि.श.कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

३. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये(सर्व विभाग)
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२. सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग
१३. निवड नस्ती